# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक १७/१०/२०२६

## महामार्ग क्र. ५३ वरील गॅस गळतीच्या घटनेत वडोदा पोलीसांची तत्पर कार्यवाही;
## प्रभावी उपाययोजनांमुळे संभाव्य दुर्घटना टळली

पोलीस स्टेशन वडोदा:— मा. **श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात तसेच श्री शशांत एम एम ,सहा पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या नेतृत्वात सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांच्यासह वडोदा पोलीसांनी गॅस गळती घटनेत तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवून विविध यंत्रणांच्या समन्वयातून संभाव्य दुर्घटना टाळण्यात यश मिळविले आहे.**

दिनांक १६/१०/२०२६ रोजी १८:३० वाजताच्या सुमारास डायल ११२ वाहनाद्वारे महामार्गावर पेट्रोलिंग करीत असतांना वडोदा पोलीसांना माहीती मिळाली की, महामार्ग क्र. ५३ वरील सावळी फाटा परिसरात गॅस सिलिंडर वाहतूक करणाऱ्या ट्रकमधून गॅस गळती होत आहे. सदर माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्यांनी सदर माहीती सहा पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांना दिली. त्यांनी पोलीस स्टाफ सह तातडीने घटनास्थळी गाठले. ट्रक क्रमांक एनएल—०१—ए एल —११०१ मधून सीएनजी गॅस सिलेंडर मधुन गळती होत असल्याचे दिसले. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू करण्यात आल्या.सदर ट्रक रिलायन्स कंपनी रायपुर येथुन नमुद सिलेंडर घेवुन गौंडखैरी कडे निघाले होता.

घटनास्थळी पोलीसांनी महामार्गाच्या दोन्ही बाजूंची वाहतूक सुमारे ५०० मीटर अंतरापर्यंत थांबवून योग्य बॅरिकेडिंग केले. सावळी फाटा परिसरातील दुकानदारांना सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक सूचना देऊन परिसर रिकामा करण्यात आला. तसेच गॅस गळतीमुळे आग लागण्याची किंवा अन्य दुर्घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांशी समन्वय साधत परिसरातील वीजपुरवठा बंद करण्यात आला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच मौदा येथील जिओ सीएनजी कंपनीच्या तज्ज्ञ पथकाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

दरम्यान, महामार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला कोणताही धोका निर्माण होऊ नये, यासाठी वाहतुक शाखा पारडी, नागपुर शहर पोलीस स्टेशन मौदा, महामार्ग पोलीस तसेच जिल्हा वाहतूक शाखा, नागपूर ग्रामीण यांच्याशी समन्वय साधण्यात आला. त्यानुसार संबंधित मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली. तसेच टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांच्या मदतीने वाहनचालकांना दिशादर्शक सूचना देण्यात आल्या.

जिओ सीएनजी कंपनीच्या तज्ज्ञ पथकाने घटनास्थळी पोहोचून परिस्थितीची पाहणी केली व गॅस गळती थांबविण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली. गॅस गळतीवर नियंत्रण मिळविल्यानंतर संबंधित ट्रक सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आला. परिस्थिती सुरक्षित असल्याची खात्री केल्यानंतर महामार्गावरील वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. वडोदा पोलीसांनी वेळीच परिस्थितीचे गांभीर्य ओळखून वाहतूक नियंत्रण, परिसर सुरक्षित करणे, वीजपुरवठा खंडित करणे आणि विविध यंत्रणांशी समन्वय साधणे या उपाययोजना केल्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यात यश आले. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाली नाही.



लोकमत समाचार

**हादसा** वडोदा पुलिस की तत्परता से टला बड़ा हादसा

# महामार्ग पर गैस रिसाव

लोकमत समाचार सेवा

**नागपुर :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 53 पर सावली फाटा के पास सीएनजी गैस सिलेंडर ले जा रहे ट्रक से रिसाव होने की घटना में वडोदा पुलिस ने तत्काल कार्रवाई करते हुए संभावित दुर्घटना टाल दी.

इस दौरान करीब 1100 किलो गैस से भरे सिलेंडर ट्रक में रिसाव की जानकारी मिली. घटना 16 अक्तूबर की शाम करीब 6.30 बजे सामने आई. डायल 112 के माध्यम से गश्त कर रही पुलिस को सूचना मिलते ही सहायक पुलिस निरीक्षक मनोज गदादे पुलिस दल के साथ मौके पर पहुंचे. ट्रक क्रमांक एनएल-01/एएल-1101 रिलायंस कंपनी, रायपुर से सिलेंडर लेकर गोंडखैरी की ओर जा रहा था. स्थिति की गंभीरता को देखते हुए पुलिस ने महामार्ग के दोनों ओर करीब 500 मीटर तक यातायात रोककर बैरिकेडिंग की. सावली फाटा क्षेत्र की दुकानों को खाली कराया गया और आग लगने की आशंका के मद्देनजर बिजली आपूर्ति बंद कराई गई. अग्निशमन दल, एंबुलेंस और मौदा स्थित जिओ सीएनजी कंपनी



1100 किलो गैस से भरे सिलेंडरों के ट्रक में हो रहा था गैस का रिसाव.

के विशेषज्ञ दल को भी बुलाया गया. पारडी यातायात शाखा, मौदा पुलिस, महामार्ग पुलिस और नागपुर ग्रामीण जिला यातायात शाखा के समन्वय से वाहनों को वैकल्पिक मार्गों से भेजा गया. टोल नाके के कर्मचारियों ने भी वाहन चालकों को दिशा-निर्देश दिए. जिओ सीएनजी के विशेषज्ञों ने मौके पर पहुंचकर गैस रिसाव पर नियंत्रण पाया और ट्रक को सुरक्षित स्थान पर पहुंचाया. स्थिति सामान्य होने के बाद यातायात फिर शुरु कर दिया गया. कार्रवाई वरिष्ठ पुलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पुलिस अधीक्षक अनिल म्हस्के तथा सहायक पुलिस अधीक्षक एवं कन्हान उपविभागीय पुलिस अधिकारी शशांत एमएम के मार्गदर्शन में की गई. घटना में किसी प्रकार की जनहानि या संपत्ति का नुकसान नहीं हुआ.